स्थापना ।। श्री दत्त प्रसन्न ।। 1987

# दत्तसेवा

## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

रजि. नं. बी.ओ.एम./डब्ल्यू.पी./आर.एस.आर./(सी.आर.)/११०२/८७.

पश्चिम उपनगरातील अग्रेसर पतपेढी

संमिश्र व्यवसाय 363 कोटीचा टप्पा पार

**पुढील लक्ष्य 500 कोटी...**




# ३२ वा वार्षिक अहवाल

२०१८-२०१९

प्रधान कार्यालय :
1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड,
मालवणी अग्निशमन केंद्रासमोर,
मालाड (पश्चिम), मुंबई-95.
फोन नं. : 2888 9027/8108160101/113
Website : www.dattaseva.com
Email : dattasevapatpedhi@gmail.com

# दत्तसेवा
## सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

## संचालक मंडळ



श्री. आनंदराव ई. माईंगडे
संस्थापक/अध्यक्ष



श्री. गोपीनाथ म. राणे
उपाध्यक्ष



श्री. विनय गो. जोशी
संचालक



श्री. जयवंत ग. पाटील
संचालक



श्री. प्रभाकर ज. धुरी
संचालक



श्री. प्रदिप नि. कदम
संचालक



श्री. अरविंद रा. को
संचालक



श्री. भार्गवदास रा. जाधव
संचालक



श्री. वसंत कृ. पाटील
संचालक



श्रीम. शिवगामी उ. पिल्लई
संचालिका



सौ. स्नेहा शे. सुतार
संचालिका



श्री. प्रभाकर गो. देसाई
तज्ञ संचालक



ॲड. जयसिंग एस. सुर्यवंशी
तज्ञ संचालक



श्री. हरी के. पाटील
मुख्यव्यवस्थापक



सौ. अर्चना आ. माईंगडे
उप मुख्यव्यवस्थापक

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई

## 32 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्या. मुंबई या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची 32 वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 11/08/2019 रोजी सायंकाळी 4.30 वाजता श्री श्याम सत्संग भवन, महावीर नगर जवळ, एकता नगर, लिंक रोड, ब्लू आर्च बिल्डींग मागे, कांदिवली (प.), मुंबई - 400 067. येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

## सभेपुढील विषय

1) दि. 01/09/2018 रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक 31 मार्च 2019 पर्यंतच्या कार्याचा अहवाल, ताळेबंद पत्रक व त्या सालाचे नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
3) सन 2018-19 या सालचा अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.
4) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
5) सन 2019-20 करिता अंतर्गत व कर लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
6) सन 2019-20 करिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
7) सन 2018-19 मधील अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देऊन त्यामधील ज्यादा खर्चास मान्यता देणे व सन 2019-20 सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
8) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
9) नवीन शाखा सुरु करण्याबाबत विचार विनीमय करणे.
10) कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.
11) कर्मचारी सेवा नियमास मंजुरी देणे.
12) जागा खरेदी बाबत चर्चा करणे.
13) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती त्यांनी विनंती केल्यानुसार क्षमापित करणे.
14) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
15) सन 2017-18 च्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
16) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
सही/-
**श्री. हरी पाटील**
मुख्यव्यवस्थापक

स्थळ : मालाड, मुंबई 400 095.
दिनांक : 22/07/2019

---

## विशेष सुचना

1. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी वरील विषयांवर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
2. ज्या सभासदांना ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकाबाबत लेखी सुचना करावयाच्या असल्यास सभेच्या चार दिवस अगोदर कार्यालयात आणून द्याव्यात. ऐनवेळी आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
3. सभासदांनी आपल्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यातील बदलासंबंधी तसेच फोन नंबरबाबत संस्थेस त्वरीत कळवावे.
4. ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नसतील त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेऊन जावेत.
5. ज्या सभासदांनी 3 वर्षातील लाभांश घेतला नसेल तो त्वरीत घेऊन जावा. जर लाभांशाची रक्कम घेऊन न गेल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे लाभांश राखीव निधीमध्ये वर्ग केला जाईल.

संचालक मंडळ

## अध्यक्षांचे
# मनोगत....

सन्माननीय सभासद बंधू भगिनी यांस सस्नेह नमस्कार.....

आपल्या संस्थेचा सन 2018-2019 चा 32 वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालकांच्या वतीने आपणासमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

तळागळातील लोकांना बचतीची सवय लागावी व त्यांचे आयुष्य सुसह्य करुन त्यांना आर्थिक दृष्ट्या प्रबळ करण्याकरीता 27 जुलै 1987 साली मालवणी सारख्या मागासलेल्या विभागात दत्तसेवा सहकारी पतपेढीची स्थापना झाली.

संस्थेचा प्रवास गेली 32 वर्षे अविरत चालू आहे. संस्थेच्या आज 18 शाखा कार्यरत असून या शाखांवर प्रशासकीय कार्यालय व वसुली विभागाद्वारे नियंत्रण केले जाते. संस्थेने 32 वर्षात केलेल्या प्रगतीमुळे आज पश्चिम उपनगरातील अग्रगण्य पतपेढी म्हणून नावलौकीक आहे. संस्थेची प्रगती ही संस्थेचे संचालक, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांच्या सहकार्याने झालेली आहे. संस्थेतील संचालक, अधिकारी, कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांना नवनवीन आव्हानांना सामोरे जाणेकरीता वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते.

सहकार क्षेत्रासमोर असलेली नवी आव्हाने, मोठ्या प्रमाणातील स्पर्धा यामध्ये देखील संस्थेने आपली वाटचाल खंबीरपणे चालू ठेवली आहे. सभासदांना जलद व गुणवत्तापुर्वक सेवा देण्यासाठी सर्व शाखा कोअर बँकींग प्रणालीने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळे कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येतात. तसेच संस्थेचे सर्व व्यवहार, दैनंदिन ठेव व इतर सर्व संकलनाचे काम मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. त्यामुळे सभासदांना त्यांचे दैनंदिन ठेवीचे व्यवहार मोबाईलवर पाहता येणे शक्य झाले आहे.

सभासदांच्या व कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करुन सभासद कल्याण निधी तयार केला असून त्यामार्फत सभासदांना व कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत करणेकरीता नियमानुसार प्रयत्न केला जातो.

नोटबंदी व जीएसटी याचा परिणाम व्यावसायिकांवर होवूनही संस्थेची प्रगती सर्व समावेशक आहे. आर्थिक वर्षात संस्थेने रु. 363 कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संस्थेचा निधी 31 कोटी, ठेवी 186 कोटी, कर्ज 177 कोटी तर गुंतवणूक 69 कोटी आहे. मागील वार्षिक सभेत संस्थेची ठेव, निधी व कर्ज याबाबत चांगली प्रगती केल्याचे व गुंतवणूक प्रमाणात असल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले होते. संस्थेने सतत सभासदांना 10 टक्के लाभांश दिला आहे व सतत ऑडीट वर्ग 'अ' मिळवला आहे.

संस्थेच्या पारदर्शी कारभारामुळेच सभासदांचा विश्वास संस्थेने संपादन केलेला आहे. संस्थेस माहे जानेवारी 2019 मध्ये उत्कृष्ट कामगिरीबाबत पश्चिम उपनगरे जिल्हा पतसंस्था फेडरेशन मार्फत 100 कोटी ठेवीवरील गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले आहे. तसेच संस्थेतर्फे कर्मचाऱ्यांना व सभासदांना नियमितपणे प्रशिक्षण दिले जाते.

संस्थेने आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न राहता सामाजिक कार्य म्हणून मागील वर्षी मुंबई महानगरपालिका महापौर निधीस रु. 61,000/- धनादेश दिला आहे. तसेच वृक्षारोपण, गुणवंत विद्यार्थी सोहळा, आरोग्य शिबिर व गरजू मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप इत्यादी उपक्रम राबविले आहेत.

आज अखेर संस्थेच्या प्रगतीकरीता आपण सभासदांनी दाखविलेला विश्वास व प्रेम असेच वृध्दींगत व्हावे हिच प्रभुचरणी प्रार्थना.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

धन्यवाद !

**मा. श्री. आनंदराव माईंगडे**
संस्थापक / अध्यक्ष

## * अहवाल सालातील विशेष उल्लेखनीय कार्य *

**खेळते भागभांडवल :-**

संस्थेने सभासदांना दिलेली दर्जेदार सेवा, सभासदांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे संस्थेने 31 मार्च 2019 अखेर 294.47 कोटी खेळते भागभांडवलाचा टप्पा पूर्ण केला आहे. तर 363 कोटी संमिश्र व्यवसाय पूर्तता केली आहे, ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने विशेष अभिनंदनीय आहे.

**स्वतःच्या मालकीची शाखा कार्यालये :-**

संस्थेचे प्रधान कार्यालय व 18 शाखा सभासदांच्या सेवेशी कार्यरत आहेत. त्यापैकी मालवणी, गोरेगांव(प.), गोराई(प.), जोगेश्वरी (प.), कांदिवली (प.), जोगेश्वरी (पू.), मालाड (पू.), नायगाव(प.), दहिसर(पु.), म्हाडा (मालवणी), भांडुप (प.), विरार (पू.), घाटकोपर या 13 शाखा संस्थेच्या स्वमालकीच्या असून त्याची किंमत आजच्या बाजारभावाप्रमाणे सुमारे 8 कोटीपेक्षा जास्त आहे.

**मान्यवरांच्या भेटी :-**

अहवाल सालात संस्थेच्या प्रधान कार्यालयाबरोबर शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करून माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे व प्रगतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांचे आभारी आहे.

**शिक्षण व प्रशिक्षण :-**

सहकार खात्याच्या नियमानुसार पतसंस्थेच्या संचालक व कर्मचारी यांनी 3 दिवस प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. यानुसार संस्थेने सन 2018-19 या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे सहभाग घेऊन सभासद, संचालक व कर्मचारी यांना 100% प्रशिक्षण दिले आहे.

1) दि. 22/08/2018 रोजी मुंबई सहकारी बोर्डाच्या वतीने कांदिवली (प.) येथे सभासद प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रमांस 750 सभासद उपस्थित होते.
2) दि. 25/09/2018 ते दि. 26/09/2018 या कालावधीमध्ये लोणावळा येथे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमास 2 संचालक उपस्थित होते.
3) दि. 29/09/2018 रोजी बोरीवली (पुर्व) येथे पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व सहकार भारतीच्या वतीने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये संचालक व कर्मचारी असे एकूण 30 प्रतिनिधी उपस्थित होते.
4) दि. 16/11/2018 ते 17/11/2018 रोजी सिल्वासा (गुजरात) येथे सहकार भारती च्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास 4 अधिकारी उपस्थित होते.
5) दि. 22/12/2018 रोजी तुरुकवाडी (कोल्हापुर) येथे सहकार मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. त्यास इतर संस्थांचे व संस्थेचे मिळून एकूण 200 प्रतिनिधी उपस्थित होते.
6) दि. 18/01/2019 ते दि. 20/01/2019 या कालावधी मध्ये नायगाव (वसई) येथे पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशन व सहकार भारतीच्या वतीने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये संचालक व कर्मचारी असे एकूण 15 प्रतिनिधी उपस्थित होते.
7) दि. 16/02/2019 ते 17/02/2019 या कालावधीमध्ये अलिबाग येथे बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास 2 संचालक उपस्थित होते.
8) दि. 15/03/2019 रोजी बोरीवली (प.) येथे मुंबई सहकारी बोर्डाच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमास संस्थेचे 30 प्रतिनिधी उपस्थित होते.
9) संस्थेचे गोराई (बोरीवली प.) येथे स्वमालकीचे प्रशिक्षण केंद्र असून संस्थेच्या अधिकाऱ्यामार्फत कर्मचारी व दैनंदिन प्रतिनिधी यांना नियमित प्रशिक्षण दिले जाते.

**सभासद :-**

मागील अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या 41595 होती. अहवाल वर्षात 6973 नवीन सभासद झाले. त्यामधील 865 सभासदांनी अन्य कारणास्तव राजीनामे दिले. अहवाल वर्ष अखेरीस 47703 कायम सभासद संस्थेच्या पटावर आहेत.

**भाग भांडवल :-**

आपल्या संस्थेचे अधिकृत भागभांडवल ₹ 20 कोटी असून मागील अहवाल वर्षाअखेर संस्थेची भागभांडवल रक्कम ₹ 10,21,88,500/- होती. अहवाल वर्षामध्ये नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून (कर्ज वाटपाच्या प्रमाणात) वसुल झाल्याने भाग रक्कम ₹ 2,04,75,030/- जमा झाली आहे. काही सभासद स्थलांतरित झाल्याने व राजीनामा दिल्याने ₹ 70,17,800/-चे भाग परत देण्यात आले. अहवाल वर्षाअखेर शिल्लक भागभांडवल ₹ 11,56,45,730/- आहे.

**राखीव व अन्य निधी :-**

अहवाल वर्षाच्या सुरूवातीला राखीव व अन्य निधी रक्कम ₹ 23,70,51,330.85 होता. अहवाल साली ₹ 6,15,18,417.62 इतक्या तरतूदी करण्यात आल्या असुन 31 मार्च 2019 अखेरीस एकूण ₹ 29,85,69,748.47 इतका निधी जमा आहे.

**गुंतवणूक :-**

अहवाल सालाच्या सुरूवातीस अतिरिक्त व राखीव निधी व तरलतेपोटी ₹ 58,50,96,385.15 विविध बँकेमध्ये गुंतवणूक केली होती. संस्थेच्या विविध ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व सहकार आयुक्तांनी लागू केलेले सी. डी. रेशोचे प्रमाण व तरलता गुंतवणूकीचे निकष विचारात घेऊन ठेवीदारांची रक्कम आवश्यकतेप्रमाणे ठेवीदारांना त्वरीत परत करता यावी या उद्देशाने अहवाल सालात संस्थेने एकूण ₹ 69,10,61,324.50 एवढी गुंतवणूक विविध बँकेत केलेली आहे.

**ऑडीट वर्ग :-**

संस्थेचे सन 2018-2019 या अहवाल वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण एस. बी. सणस ॲण्ड असोसिएट्स प्रमाणित लेखापरिक्षक यांनी केले. तसेच वैधानिक लेखा परिक्षण नरेंद्र एस. बर्वे ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौटंट यांनी केले असून संस्थेस वैधानिक लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग मिळाला आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण 20 सभा झाल्या. या सभांना सर्व संचालक जास्तीत जास्त संख्येने उपस्थित होते. प्रत्येक सभेत संस्थेचे हित व प्रगतीचा विचार करून सर्वानुमते निर्णय घेण्यात आले आहेत.

**कार्यक्षेत्र :-**

संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, सिंधुदूर्ग, पालघर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब :-**

बँकींग क्षेत्रात सर्वत्र होत असलेला इंटरनेटचा वापर लक्षात घेता संस्थेने मोबाईलद्वारे डेली कलेक्शन करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली असून लवकरच सर्व दैनंदिन ठेवीदारांना त्याची जमा झालेली व एकूण जमा रकमेची माहिती वेळच्या वेळी मिळणार आहे.

**कर्मचारी वर्ग :-**

संस्थेतील अंतर्गत कामकाजाची पूर्तता करण्याकरीता वरिष्ठ अधिकारी, विभागीय अधिकारी, शाखाधिकारी व वरिष्ठ लिपिक, वसुली अधिकारी, रोखपाल, लिपिक, शिपाई असे एकूण 107 कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कामाची विभागणी करून जबाबदारी देण्यात आल्यामुळे संस्थेच्या अंतर्गत कामकाजाचा दर्जा उंचावला आहे.

**ठेव संकलन प्रतिनिधी :-**

संस्थेचा प्रचार हा ठेव संकलन प्रतिनिधीद्वारे होत असतो व घरपोच सेवा देण्याचे काम ते करतात. अहवाल सालात संस्थेच्या विविध शाखेत 125 दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये व संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**संचालक व त्यांचे नातेवाईक कर्ज तपशिल :**

महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 75 (2) नुसार 31 मार्च 2019 अखेर संचालक आणि त्यांच्या नातलगांच्या नांवे ₹ 96,67,398/- कर्ज शिल्लक आहे.

**कर्ज वसुली अधिकार :**

मा. अप्पर आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संस्थेचे मुख्य वसुली अधिकारी श्री. नंदकुमार दत्तात्रय पाटील, शाखाधिकारी श्री. शशिकांत जयवंत पाटील, श्री. लक्ष्मण बाबूराव पाटील, श्री. कृष्णा रंगराव जाधव, श्री. जितेंद्र शामराव साळवी व वसुली अधिकारी श्री. महेश कृष्णा दळवी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 156 व नियम 107 नुसार शासकीय वसुली अधिकाऱ्याचे अधिकार प्रदान केले आहेत. ज्या कर्जदारांवर कोर्ट कारवाई करून वसुली दाखला घेण्यात आलेला आहे. त्या सभासदांनी आपले थकीत कर्ज भरावे अन्यथा त्यांच्यावर जप्ती, पगारकपात इ. कायदेशीर कारवाई होऊ शकते. याबाबत आपल्या काही अडचणी असल्यास कार्यालयात हजर राहून अधिकारी अथवा संचालक मंडळा समोर समक्ष चर्चा करावी ही विनंती.

**सभासद ठेवी :**

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्था ठेवी वाढविणेबाबत वेगवेगळे उपक्रम राबवित असते. यामुळे अहवाल सालात ठेवीमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. संस्थेकडे मागील वर्षाअखेर विविध ठेव खात्यामध्ये रक्कम ₹ 166.97 कोटी शिल्लक होती. अहवाल वर्षात ₹ 290.64 कोटी ठेवी पोटी जमा झाले असून मुदत संपल्यानंतर सभासदांना ₹ 270.91 कोटी च्या ठेवी परत केल्या असून अहवाल वर्षाअखेर ₹ 186.70 कोटी ठेवी शिल्लक आहेत. गतवर्षाच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये 11.82% वाढ झालेली आहे. त्याची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

**※ ठेव प्रगती नक्ता ※**

(₹. कोटीत)

| अ. क्र. | ठेवीचा प्रकार | 31 मार्च 2018 अखेर शिल्लक जमा | अहवाल वर्षातील जमा | अहवाल वर्षातील परत दिलेली रक्कम | 31 मार्च 2019 अखेर शिल्लक | ठेवीमध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बचत ठेव | 9.51 | 132.82 | 134.32 | 8.01 | -15.77% |
| 2 | मुदत ठेव | 41.52 | 38.84 | 30.18 | 50.18 | 20.86% |
| 3 | दामदुप्पट ठेव | 14.17 | 4.52 | 2.62 | 16.07 | 13.41% |
| 4 | मासिक ठेवी | 1.60 | 1.34 | 1.85 | 1.09 | -31.88% |
| 5 | सक्तीची बचत ठेव | 1.44 | 0.60 | 0.29 | 1.75 | 21.53% |
| 6 | लखपती ठेव | 0.[illegible] | 1.01 | 0.13 | 1.35 | 187.23% |
| 7 | त्रिमुर्ती दैनंदिन ठेव | 25.12 | 72.40 | 71.31 | 26.21 | 4.34% |
| 8 | दाम तिप्पट ठेव | 0.52 | 0.23 | 0.16 | 0.59 | 13.46% |
| 9 | मासिक लखपती ठेव | 1.04 | 1.30 | 0.91 | 1.43 | 37.50% |
| 10 | दाम चौपट ठेव | 4.18 | 1.19 | 0.24 | 5.13 | 22.73% |
| 11 | मासिक व्याज परतावा | 19.20 | 5.48 | 2.96 | 21.72 | 13.13% |
| 12 | दैनंदिन प्रतिनिधी ठेव | 1.45 | 0.36 | 0.13 | 1.68 | 15.86% |
| 13 | दिपलक्ष्मी ठेव | 19.57 | 13.76 | 8.61 | 24.72 | 26.32% |
| 14 | मंगलमुर्ती ठेव | 8.95 | 1.96 | 5.57 | 5.34 | -40.34% |
| 15 | महालक्ष्मी ठेव | 12.79 | 6.46 | 5.09 | 14.16 | 10.71% |
| 16 | वसंतपंचमी ठेव | 3.10 | 3.90 | 1.50 | 5.50 | 77.42% |
| 17 | संचय ठेव | 0.18 | 0.52 | 0.34 | 0.36 | 100.00% |
| 18 | कॉल ठेव | 0.98 | 3.84 | 4.16 | 0.66 | -32.65% |
| 19 | कर्मचारी उत्कर्ष ठेव | 1.18 | 0.11 | 0.54 | 0.75 | -36.44% |
| | एकूण | 166.97 | 290.64 | 270.91 | 186.70 | 11.82% |

**कर्ज तपशील :-**

वित्तीय संस्थांमधील वाढत्या स्पर्धेमुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी सभासदांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने सभासद राजा आहे. परिणामी कर्जाची मागणी दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. तथापि सभासदांच्या अधिकाधिक आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने संस्थेने विविध कर्ज योजना सुरु केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे.

मागील वर्षाअखेर संस्थेकडे एकूण ₹ 161.70 कोटी कर्ज येणे शिल्लक होते. अहवाल वर्षात संस्थेने ₹ 91.74/– कोटी कर्ज वाटप केले. अहवाल वर्षात ₹ 76.22/– कोटी कर्ज वसूल झाले आहे. अहवाल वर्षाअखेर सभासदाकडून ₹ 177.22/– कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये 9.60% वाढ झालेली आहे.

## * कर्ज तपशील तक्ता (तुलनात्मक आकडेवारी) *

(₹. कोटीत)

| अ. क्र. | कर्जाचा प्रकार | 31 मार्च 2018 अखेर शिल्लक | अहवाल वर्षातील कर्ज वसुल | अहवाल वर्षातील कर्ज वाटप | 31 मार्च 2019 अखेर कर्ज शिल्लक | कर्जामध्ये झालेली वाढ/घट% |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | वैयक्तिक जामिनकी कर्ज | 9.93 | 4.04 | 7.52 | 13.41 | 35.05% |
| 2. | वाहन तारण कर्ज | 10.30 | 3.48 | 2.69 | 9.51 | -7.67% |
| 3. | व्यावसायिक कर्ज | 91.96 | 20.39 | 30.94 | 102.51 | 11.47% |
| 4. | गृहतारण कर्ज | 27.40 | 6.55 | 8.56 | 29.41 | 7.34% |
| 5. | तात्काळ कर्ज | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.00% |
| 6. | इतर तारण कर्ज | 0.93 | 0.87 | 0.02 | 0.08 | -91.40% |
| 7. | दैनंदिन ठेव तारण कर्ज | 3.24 | 18.15 | 17.63 | 2.72 | -16.05% |
| 8. | सोने तारण कर्ज | 3.81 | 5.85 | 5.80 | 3.76 | -1.31% |
| 9. | कर्मचारी गृहतारण कर्ज | 3.82 | 0.60 | 0.61 | 3.83 | 0.26% |
| 10. | कर्मचारी कर्ज | 0.17 | 0.10 | 0.10 | 0.17 | 0.00% |
| 11. | कर्मचारी वाहनतारण कर्ज | 0.06 | 0.03 | 0.01 | 0.04 | -33.33% |
| 12. | दामदुप्पट ठेव कर्ज | 0.92 | 1.81 | 1.92 | 1.03 | 11.96% |
| 13. | मुदत ठेव कर्ज | 1.42 | 3.84 | 4.08 | 1.66 | 16.90% |
| 14. | लखपती ठेव कर्ज | 0.04 | 0.12 | 0.34 | 0.26 | 550.00% |
| 15. | दामतिप्पट ठेव कर्ज | 0.05 | 0.05 | 0.07 | 0.07 | 40.00% |
| 16. | दामचौपट ठेव कर्ज | 0.77 | 0.71 | 0.78 | 0.84 | 9.09% |
| 17. | दिपलक्ष्मी ठेव कर्ज | 0.53 | 1.58 | 2.00 | 0.95 | 79.25% |
| 18. | एम.आय.एस.ठेव तारण कर्ज | 1.17 | 2.76 | 3.65 | 2.06 | 76.07% |
| 19. | मंगलमुर्ती ठेव कर्ज | 0.23 | 0.40 | 0.49 | 0.32 | 39.13% |
| 20. | रिकरिंग ठेव तारण कर्ज | 0.01 | 0.05 | 0.04 | 0.00 | -100.00% |
| 21. | महालक्ष्मी ठेव कर्ज | 0.45 | 0.65 | 0.35 | 0.15 | -66.67% |
| 22. | मासिक लखपती ठेव कर्ज | 0.04 | 0.12 | 0.13 | 0.05 | 25.00% |
| 23. | वसंत पंचमी ठेव कर्ज | 0.14 | 0.23 | 0.28 | 0.19 | 35.71% |
| 24. | डिपॉझिट कॅश क्रेडिट कर्ज | 0.30 | 0.16 | 0.11 | 0.25 | -16.67% |
| 25. | महिला बचतगट कर्ज | 3.24 | 2.64 | 2.36 | 2.96 | -8.64% |
| 26. | संचय ठेव तारण कर्ज | 0.00 | 0.04 | 0.04 | 0.00 | 0.00% |
| 27. | कॅश क्रेडिट कर्ज | 0.75 | 0.98 | 1.20 | 0.97 | 29.33% |
| | एकूण | 161.70 | 76.22 | 91.74 | 177.22 | 9.60% |

**नफा विभागणी :**

संस्थेस सन 2018-2019 या वर्षात तरतुदी व खर्च वजा जाता ₹ 2,29,01,576.05 नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा ₹ 27,758.72 मिळून एकूण ₹ 2,29,29,334.77 नफा झालेला आहे. त्याची विभागणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे. त्यास मान्यता मिळावी.

| | |
|---|---|
| राखीव निधी 25% (Reserve Fund) | ₹ 57,32,334.00 |
| लाभांश 10% (Dividend) | ₹ 1,05,96,945.00 |
| इमारत निधी (Building Fund) | ₹ 35,00,000.00 |
| धर्मादाय निधी (Charity Fund) | ₹ 50,000.00 |
| शिक्षण उत्तेजनार्थ निधी (Education Dev. Fund) | ₹ 3,00,000.00 |
| सभासद कल्याण निधी (Member Welfare Fund) | ₹ 3,00,000.00 |
| लाभांश समिकरण निधी (Dividend Equilasation Fund) | ₹ 3,40,000.00 |
| क्रिडा व सांस्कृतिक निधी (Sports & Activity Fund) | ₹ 1,00,000.00 |
| सर्व हितकारी निधी ( Fund) | ₹ 20,00,000.00 |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक (Next Year Balance) | ₹ 10,055.77 |
| एकूण (TOTAL) | ₹ 2,29,29,334.77 |



# हार्दिक अभिनंदन !



1) भारतीय वायू सेनेच्या बालाकोट हल्ल्यामध्ये विंग कमांडर मा. श्री. अभिनंदन वर्धमान यांनी दाखविलेल्या शौर्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

2) संस्थेच्या कांदिवली शाखेचे दैनंदिन प्रतिनिधी श्री. प्रताप भोसले यांचा मुलगा कु. श्रीवर्धन भोसले यांनी इ. 10 मध्ये 94 टक्के गुण प्राप्त करुन उज्वल यश संपादन केले त्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

3) दत्तसेवा परिवार संचलित दत्तसेवा विद्यालय, तुरुकवाडी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर येथील इ. 12 वी चा निकाल 100% तसेच इ. 10 वी चा निकाल 89% लागला असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

संचालक मंडळ/कर्मचारी वृंद




पश्चिम उपनगरे पतसंस्था फेडरेशनचा १०० कोटींवरील ठेवी या गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार फेडरेशनचे अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे व कार्याध्यक्ष श्री. लक्ष्मण पाटील यांच्या हस्ते स्विकारताना संस्थेचे उपाध्यक्ष श्री. गोपीनाथ राणे व मुख्य व्यवस्थापक श्री. हरी पाटील सोबत इतर अधिकारी व कर्मचारी.




३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेच्या प्रगतीची माहिती देताना अध्यक्ष श्री. आनंदराव माईंगडे सोबत संचालक मंडळ.



३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेला सभासद वर्ग.



संस्थेच्या ३०० कोटी व्यवसायपूर्ती कार्यक्रमाप्रसंगी मा.श्री. विश्वनाथ महाडेश्वर यांच्याकडे महापौर निधीस रु. ... चा धनादेश देताना संस्थेचे अध्यक्ष सोबत मा. श्री. शिवाजीरा... मा. श्री. वसंतराव शिंदे, मा. श्री. प्रकाश दरेकर, मा. श्री. ... व मुख्य व्यवस्थापक श्री. हरी पाटील.



संस्थेच्या वतीने मौजे तुरुकवाडी, कोल्हापूर येथे कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे सोबत खेळाडू व इतर मान्यवर.



संस्थेच्या वतीने मौजे तुरुकवाडी, कोल्हापूर येथे रक्तदान व आरोग्य शिबीर आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे सोबत सरपंच श्री. गणपती कांबळे, डॉ. क्षितीज पाटील व इतर डॉक्टर.

# दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई




अंधेरी शाखेच्या नुतन कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे सोबत मा. श्री. अनिल जाधव, मा. श्री. राजेश खाडे, मा. श्री. बी. के. पवार, संस्थेचे संचालक सोबत इतर मान्यवर व कर्मचारी.



संस्थेच्या वतीने मौजे तुरुकवाडी, कोल्हापूर येथे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे, सरपंच, सदस्य, तुरुकवाडी ग्रामस्थ व दत्तसेवा विद्यालयाचे विद्यार्थी.



संस्थेच्या वतीने कांदिवली (पश्चिम) येथे संचालक, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी यांची कार्यशाळा आयोजित केली होती. त्याप्रसंगी मा.श्री. विश्वनाथ पवार-संस्थापक/संचालक, ज्ञानदिप पतसंस्था यांचा सन्मान करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे व मा. श्री. बाळ पाटील-अध्यक्ष, विशालदिप पतसंस्था.



मौजे तुरुकवाडी, कोल्हापूर येथे ग्रामीण भागातील मुलांकरिता स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले असून त्याचे उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, तुरुकवाडी ग्रामस्थ व विद्यालयाचा शिक्षक वर्ग.



सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे नियोजन करिता संचालक मंडळ व कर्मचारी यांच्या धोरणात्मक सभेप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, संचालक व कर्मचारी वर्ग.



स्वातंत्र्यदिनी दत्तसेवा विद्यालय, तुरुकवाडी येथे ध्वजारोहण करताना सौ. अर्चना माईंगडे सोबत संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव माईंगडे तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. सतिश माईंगडे सोबत विद्यालयाचे पदाधिकारी व शिक्षक वर्ग.

प्रेषक,
**दत्तसेवा सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई.**
1/136, बी.एम.सी. कॉलनी, मार्वे रोड, मालवणी,
अग्निशमन केंद्रासमोर, मालाड पश्चिम, मुंबई - 95.
दुरध्वनी : 8108160113/8108160101
Email : dattasevapatpedhi@gmail.com
Website : www.dattaseva.com

सभासद क्र. ________

बुक-पोस्ट

प्रति,
श्री./श्रीमती ________________

युनिटी प्रिंटींग प्रेस - २३७०१९५१ / ९८२०४६०३१४ / ९८२०६१३०८५ Email : unityppnikam@gmail.com